साप्ताहिक
# परळी परिसर

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २१ ऑक्टोबर २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

## बागझरी येथील श्री दत्त मंदिरात दर्शन घेऊन ना.मुंडे यांनी केला निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ

परळी वैद्यनाथ (बातमीदार):- पट्टीवडगाव जिल्हा परिषद गटातील बागझरी येथील दत्त मंदिरात दर्शन घेऊन आरती करत आज धनंजय मुंडे यांनी परळी विधानसभा मतदारसंघात प्रचाराचा शुभारंभ केला आहे. धनंजय मुंडे यांनी सर्वात पहिल्यांदा लढवलेल्या २००२ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत सुद्धा प्रचाराचा शुभारंभ त्यांनी बागझरीच्या याच दत्त मंदिरात दर्शन घेऊन केला होता. धनंजय मुंडेंच्या प्रत्येक निवडणुकीची सुरुवात बागझरी येथील दत्त मंदिराच्या दर्शनाने होत असते.

मुंडे कुटुंबाच्या दोन पिढ्या तुमच्या सर्वांची सेवा करण्यात गेल्या. आजही आम्हाला सेवेची संधी मिळते ती तुमच्याच आशीर्वादाने, आपण मतदारसंघात विकासासाठी दिलेला प्रत्यक्ष शब्द पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. प्रचंड प्रमाणात विकास निधी खेचून आणला.



मात्र देशाचे काही उच्चपदस्थ नेते माझा पराभव करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु तुम्हीच मला तुमच्या आशीर्वादाने आज पर्यंत इथवर आणले आहे. त्याला तुम्हीच निर्माण केले आज त्यालाच संपवण्याची भाषा केली जात असेल किंबहुना तसे आव्हान दिले जात असेल तर अशा लोकांना २० नोव्हेंबर रोजी मतदानातून तुम्ही दाखवून द्या असे आवाहन यावेळी बागझरी व परिसरातील नागरिकांशी संवाद साधताना धनंजय मुंडे यांनी केले.

मी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही ज्या दिवशी जात बघून किंवा जात दाखवून मतदान मागायची माझ्यावर पाळी येईल त्या दिवशी मी राजकारण सोडून देईल. कोरोना काळात केलेली मदत आठवा त्यावेळी सुद्धा आपण सर्वांना सोबत घेऊन आपल्याकडून जी शक्य ती सर्व मदत केली. तेव्हा आता तुम्ही स्वतः उमेदवार आहेत असे समजून तुम्ही कामाला लागा असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी विश्वंभर फड, गणेश कराड, बबन मुंडे, लिंबराज लहाने,विनोद लहान, प्रशांत दहिफळे, माने सर, धनंजय सोळंके यांसह आदी उपस्थित होते. ***

## सौ.सुदामतीताई गुट्टे, सुनील गुट्टे यांनी मुंबईत घेतली शरद पवारांची भेट



मुंबई (बातमीदार):- सध्या राज्यात विधान सभेच्या उमेदवारी बाबत अनेक उमेदवारांची आपआपल्या पक्ष श्रेष्ठीकडे उमेदवारी मिळवण्यासाठी भेटी घेतल्या जात आहेत त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडेही परळी विधानसभा मतदारसंघात आपल्यालाच उमेदवारी मिळावी या करिता आपआपल्या परीने इच्छुक उमेदवार भेटी घेत असताना पक्षाच्या कोअर कमिटीने युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांना तातडीने मुंबई येथे बोलावून उमेदवारीबाबत चर्चा केली.

युवा नेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी रविवारी (दि.१९) सकाळी मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार, राज्य अध्यक्ष जयंत पाटिल, खा.सुप्रिया सुळे, आ.रोहित पवार यांची भेट घेऊन परळी विधानसभा मतदार संघाविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चा दरम्यान परळी मतदारसंघात सुनील गुट्टे यांनी काढलेल्या शेतकरी संवाद यात्रेचा, नौकरी महोत्सव आदी कार्याचा कार्य अहवाल पक्ष श्रेष्ठींना देऊन मतदार संघाची सद्यपरिस्थितीवर सखोल चर्चा करण्यात आली. पक्ष श्रेष्ठींकडून शेतकरी संवाद यात्रा नौकरी महोत्सवाची दखल घेऊन कौतुक केले. दरम्यान, सुनील गुट्टे, सुदामतीताई गुट्टे यांनी परळी विधानसभेच्या उमेदवारीबाबत पक्षश्रेष्ठींकडे चर्चा केली. ***

## शिर्डी एक्सप्रेस लुटीचा मोठा प्रयत्न फसला

परळी वैजनाथ, (बातमीदार):- काकीनाडा-नागरसोल शिर्डी एक्सप्रेस रविवार रोजी मध्यरात्री परळी जवळच असलेल्या वडगाव दादाहरी येथे सिग्नल मध्ये तांत्रिक बिघाड करून लुटण्याचा प्रयत्न रेल्वे सुरक्षा दलाच्या सतर्कतेमुळे असफळ ठरला असून यामध्ये एका कोच मधील दोन महिलांचे दागिने चोरट्यानी लुटले असल्याची माहिती मिळत असून याबाबत अद्याप रेल्वे पोलिसात अधिकृत गुन्हा दाखल झालेला नाही.

ट्रेन नंबर १७२०६ काकीनाडा ते नागरसोल धावणारी शिर्डी एक्सप्रेस परळी जवळील वडगाव दादाहरी येथे परळीचा दिशेने असलेल्या आउटर सिग्नलला चोरट्यानी तांत्रिक बिघाड करून उभी केली.अंदाजे ७-८ चोरट्यानी ही एक्सप्रेस लुटण्याचा प्रयत्न केला.ट्रेन मध्ये कर्तव्यावर असलेल्या रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे चोरट्यांचे रेल्वे लुटीचे मनसुबे उधळून लावत चोरट्याना पळवून लावले. यामुळे रेल्वे लुटीचा मोठा अनर्थ टळला. या घटनेत एका बोगी मध्ये २ महिलांचे दागिने चोरट्याने लंपास केली अशी माहिती समोर आली असून याबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नाही अथवा रेल्वे पोलिसात कसलाही प्रकारचा गुन्हा नोंद करण्यात आला नाही.

सदरील घटनास्थळ हे सोनपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असून वारंवार या ठिकाणी घडत असलेल्या घटनेची दखल घेत लोहमार्ग पोलीस उप विभागीय पोलीस अधिकारी लोहकरे लोहमर्ग स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी यांनी घटनस्थळाला भेट देऊन सुरक्षाचे दृष्टीने योग्य त्या सूचना दिल्या याप्रसंगी परळी लोहमार्ग पोलीस स्टेशन चे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघमोडे व स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत गंभीरराव, रेल्वे सुरक्षा बलाचे सब इन्स्पेक्टर कांबळे, परळी रेल्वे पोलीस ठाण्याचे क्राईम शाखेचे अनंत कांबळे, कोंडीराम सातपुते आदी उपस्थित होते. ***

## मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून इतरांनाही सहभागी करावे- उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर

**मतदार जनजागृती सायकल रॅलीला मोठा प्रतिसाद**



परळी वैजनाथ, (बातमीदार):- आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत परळी विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून इतरांनाही मतदान प्रक्रियेत सहभागी करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी केले. परळी विधानसभा मतदार संघात सर्वांनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी केले आहे. मतदार जनजागृतीसाठी सायकल रॅलीचे आयोजन ही परळी शहरात ठीक ठिकाणी करण्यात आले होते. दि.१९ ऑक्टोबर २०२४ शनिवार रोजी सकाळी ८:३० वा.परळी विधानसभा मतदारसंघात मतदार जनजागृती करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार -२३३ परळी विधानसभा मतदार संघ-परळी यांच्या आदेशानुसार परळी शहरामध्ये अनेक भागातून सायकल रॅलीच्या माध्यमातून डतएएझ विभागा अंतर्गत मतदार जनजागृती करण्यात आली.

या प्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी सर्व मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून इतरांनाही मतदान करण्यासाठी सहभागी करावे असे आवाहन केले. तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार व श्री. व्यंकटेश मुंडे यांनी मतदार जनजागृती साठी सर्वांनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले. या रॅली मध्ये परळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, बाल विकास प्रकल्प अधिकारी कालिदास बडे,दराडे, शिक्षण विस्तार अधिकारी हिना अन्सारी, पालिकेचे अधिकारी संतोष रोडे, तसेच

(उर्वरित पान ४ वर)

## परळी व माजलगाव विधानसभा मतदार संघ मा.क.प.लढविणार- कॉ.पी.एस.घाडगे



परळी वैजनाथ, (बातमीदार):- विद्यार्थी, युवक, शेतकरी व कष्टकरी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी माकप परळी वै व माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन निवडणुक लढविणार आहे. सत्ताधारी व विरोधक जनतेच्या प्रश्नां ऐवजी भावनिक प्रश्न पुढे करीत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघांत माकप निवडणुक लढविणार असल्याची माहिती मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कमिटी सदस्य कॉ पी एस घाडगे यांनी दिली आहे.

केंद्रात व राज्यात सत्तेत असलेल्या सरकारने शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नाची सोडवणुक करण्या ऐवजी प्रश्न वाढले आहेत. युवकांच्या हाताला काम नाही. मतदारांमध्ये विद्यमान सरकार विषयी चिड निर्माण झालेली आहे. राज्यात धर्म व जातीयवादावर निवडणुक लढविली जात आहे.

जनतेच्या प्रश्नांना जाणीवपूर्वक दुर्लक्षीत केले जात आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ व माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष निवडणुक लढविणार आहे. भाजपच्या सरकार चा पराभव करण्यासाठी महाविकास आघाडी सोबत माकप सामंजस्याची भुमिका घेत आहे. माकप बीड जिल्हा समिती ने राज्य समिती कडे दोन्ही मतदारसंघांत निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली आहे. माकप राज्य समिती ने महाविकास आघाडी कडे दोन्ही मतदारसंघ मिळावे अशी आग्रही मागणी केली आहे. बीड जिल्ह्यात माकपने शेतकरी, कष्टकरी, असंघटित क्षेत्रातील कामगार व विद्यार्थी-युवकांच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलने केली आहेत. तसेच शोषित, वंचित व महिलांच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलने केली आहेत. दोन्ही मतदारसंघांत माकप ची संघटनात्मक बांधणी आहे. समाजातल्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये पक्षाला मानणारे व चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी आहे. २०१८ पासुन केलेल्या आंदोलनामुळे कोट्यवधी रुपयांचा पिक विमा लाखो शेतकऱ्यांना मिळाला आहे. त्यासह असंघटीत क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळवून देण्यात आला आहे. त्यामुळे परळी वैजनाथ व माजलगाव मतदारसंघ महाविकास आघाडी ने माकप साठी सोडावा अशी मागणी करण्यात आलेली आहे. दोन्ही मतदारसंघांत माकप ताकतीने निवडणुका लढविणार असल्याचे माकपचे राज्य समिती सदस्य कॉ.पी.एस.घाडगे यांनी व्यक्त केला आहे.
***

संपादकीय...

# बिगूल तर वाजला...!

**सुविचार :–**
आपली लढाई आपल्यालाच लढावी लागते. लोकांचं काय ते तर साथ कमी आणि ज्ञान जास्त देण्यातच धन्यता मानत असतात.

गेल्या मंगळवारी (ता.१५) निवडणूक आयोगाने देशातील महाराष्ट्र व झारखंड या राज्यासह इतर पोटनिवडणुकांचा कार्यक्रम घोषित केला. निवडणुकांच्या तारखा जाहीर होताच या निवडणुकीची आदर्श आचारसंहिताही लागू झाली. त्या बरोबर राजकीय घडामोडींनी वेग घेतला आहे.

विधानसभेची ही निवडणूक आजपर्यंतच्या निवडणुकीपेक्षा एका अर्थाने वेगळी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनेत झालेली फूट, मराठा, धनगर आरक्षणाचा पेटलेला संघर्ष, ओबीसींचे आंदोलन नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकात केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपसह त्यांचे सहयोगी पक्ष असलेल्या महायुतीला महाराष्ट्रात बसलेला फटका, मनसे, राष्ट्रीय समाज पक्ष, वंचित बहुजन आघाडीने राज्यात या निवडणुका स्वबळावर लढण्याचा घेतलेला निर्णय, स्थापन झालेली तिसरी आघाडी, मराठा आरक्षणासाठी मराठा योद्धे मनोज जरांगे पाटील यांनी ही निवडणूक लढण्याचा घेतलेला निर्णय अशा विविध कारणांने या निवडणुकीत महाराष्ट्रातील राजकारण मोठे ढवळून निघत आहे. मंगळवार (ता.२२) पासून या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात होणार असल्याने राजकारण व राजकीय घडामोडी वेगाने पुढे जात आहेत. आपल्या सोयीसाठी नेत्यांचे पक्षांतराचे प्रवास सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर या विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील जनता कुणाला राज्याच्या सत्तेवर बसवते हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा ही राजकीय घडामोडींनी ढवळून निघाला आहे. भाजपकडून केजच्या विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यांच्या विरोधात कोण? हे अद्याप जाहीर नाही. परळीतही महायुतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व विद्यमान पालकमंत्री धनंजय मुंडे यांचा या निवडणुकीसाठी प्रचारही सुरू झाला आहे. त्यांच्या विरोधात लढण्यासाठी महाविकास आघाडीकडून युवक नेते राजेभाऊ फड, सुनील गुट्टे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांची नावे शेवटच्या टप्प्यात आघाडीवर आहेत. ही मंडळी व त्यांचे समर्थक सध्या मुंबईत उमेदवारीसाठी तळ ठोकून आहेत.

महायुतीमुळे परळी विधानसभा मतदार संघाच्या स्थापनेनंतर सलग दोनवेळा या मतदार संघाचे भाजपच्या तिकिटावर प्रतिनिधीत्व करणाऱ्या ज्येष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे या निवडणुकीत उभ्या असणार नाहीत. शिवाय इथे प्रथमच कमळ हे निवडणूक चिन्ह दिसणार नाही. गेल्या विधानसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांचा पराभव करुन विधानसभेत गेलेले आमदार धनंजय मुंडे तिसऱ्यांदा या मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत. मतदार संघात राबवलेली मोठ्या प्रमाणातील विविध विकास कामे, त्यांची सामाजिक कामे, कार्यकर्त्यांचे मोठे बळ, मानणारा मोठा वर्ग या सर्व बाबीमुळे ही निवडणूक धनंजय मुंडे यांना फारशी आवघड जाणार नसल्याचे चित्र येथे आहे. असे असले तरी त्यांना मतदार संघात अडकून ठेवण्याचे व मोठ्या ताकतीनिशी निवडणूक लढण्याचा प्रयत्न विरोधकांनी चालवला आहे. श्री मुंडे यांना तगडी फाईट देऊ शकेल असा उमेदवार परळीतून देण्यासाठी महाविकास आघाडीची तयारी आहे. यामुळे परळीची सहज वाटणारी निवडणूक मोठी चुरशीची होणार असे चित्र आता दिसू लागले आहे. मतदार संघात मराठा समाजाची मते मोठी असल्याने श्री मनोजदादा जरांगे पाटील येथे या निवडणुकीत कोणती भूमिका घेतात. उमेदवार देतात की कुणाला पाठींबा देतात हे अजून अस्पष्ट आहे. पुढील काही दिवसात हे चित्र स्पष्ट होईल.

दरम्यान, येत्या वीस नोव्हेंबरला मतदान होणाऱ्या परळी विधानसभेच्या निवडणुकीची तयारी प्रशासनाकडून झाली आहे. मतदार संघात एकूण ३६३ मतदान केंद्र असणार आहेत. त्यात परळी तालुक्यात २५८ व अंबाजोगाईत १०५ मतदान केंद्राचा समावेश आहे. एकूण मतदार तीन लाख ३५ हजार नऊशे ५४ एवढे आहेत. त्यात एक लाख ७५ हजार १८४ पुरूष तर एक लाख ६० हजार ७६६ स्त्री मतदार आहेत. यात तरुण मतदारांची संख्या लक्षणीय आहे. येथे बारा संवेदनशील मतदान केंद्र आहेत. या निवडणुकीसाठी एकूण दीड हजारावर कर्मचारी असणार आहेत. या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची तयारी सुरू आहे. एकूणच मंगळवार पासून या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात होत असल्याने या सर्व प्रक्रियेला गती येणार आहे. ***

# निवडणूक शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने बीड जिल्हा प्रशासनाकडून आदेश निर्गमित

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत जिल्ह्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा प्रशासनाने काही निर्बंध घातले आहेत. तशा स्वरूपाचे आदेश जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत.

सदरील आदेश प्रत्येकावर तामील करणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिस विभागाने जाहीर करून त्यास प्रसिद्धी द्यावी, सदरील आदेश २५ नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहतील, असेही निर्गमित आदेशांमध्ये नमूद आहे. वेगवेगळ्या आदेशात पुढील बाबी नमूद आहेत.

**शासकीय, निमशासकीय परिसर :–** जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय, शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि विश्रामगृहांच्या आवारात कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाजाचा वापर राजकीय कामासाठी करणे, रॅली काढणे, निवडणुकीसंबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग्स, होर्डिंग्ज लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, किंवा कार्यालयीन आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे, किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे इ.बाबी नियंत्रित करणे या कृती करण्यास निर्बंध घालण्यात आला आहे.

**सार्वजनिक मालमत्ता**

**विद्रुपीकरण :–** निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षाशी संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, व जाहिराती लावून सार्वजनिक मालमत्तांचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपित करण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचित केले आहे. त्यानुसार नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामीण भागात निवडणुकीच्या कालावधीत होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती प्रदर्शित करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच पूर्व परवानगी संपल्यानंतर ते दूर नष्ट करून इमारती, मालमत्ता पूर्ववत करून घेणे, जाहिराती तत्काळ काढून घेणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या कालावधीत शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात विद्रुपता करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत.

**मतपत्रिका छपाई :–**

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी, मुद्रणालय मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने, प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव, त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारात नमुना मतपत्रिका छापण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत.

**यावरही असतील निर्बंध :–**

सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण इ. करण्यावर तसेच जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रूग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर, राजकीय पक्ष, निवडणूक लढवणारे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे वाहनाच्या ताफ्यात दहापेक्षा अधिक मोटार गाड्या अथवा वाहने वापरण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध असतील.

**प्रचार वाहनांवरील झेंडा, कापडी फलक :–** प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून दोन फूट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. वाहनावर लावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

**ध्वनीक्षेपकाचा वापर :–**

ध्वनीक्षेपकाचा वापर पोलिस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. सकाळी सहा वाजण्यापूर्वी व रात्री दहा नंतर कोणत्याही फिरत्या वाहनांवर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा. ध्वनी क्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरासंबंधित घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

**रहदारीस अडथळा नको :–**

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्पलेटस्, कटआऊटस, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊ शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

**खासगी व्यक्तीच्या जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध :–** निवडणुकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार, भिंत इत्यादीच्या संबंधित जागा मालकाचे परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत आहेत, असेही नमूद आहे.

**– जिल्हा माहिती कार्यालय, बीड**

**‘परळी परिसर’** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

* वर्ष ०८ * अंक २५ * पृष्ठ संख्या– ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २१ ऑक्टोबर २०२४ * किंमत : २ रू.



**परळी** विधानसभा मतदारसंघ हा राज्याला ओळख असलेला मतदारसंघ आहे. वैद्यनाथ प्रभूंच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेली भूमी, मराठवाड्यातील सर्वात जुने रेल्वे स्थानक असल्याने दळण वळणाच्या बाबतीत जोडल्या गेलेले शहर. येथील अर्थव्यवस्था ही बहुतांश कृषी केंद्रित अर्थव्यवस्था आहे. जसा हा भाग ऊसतोड मजुरांचा भाग म्हणून ओळखला जातो तसाच हा भाग विविध अंगांनी ओळखला जातो. राजकीय दृष्ट्या राज्याला परिचित असलेला हा मतदार संघ आणि तालुका आहे. पूर्वीचा रेणापूर असलेला हा मतदारसंघ १९९२ ला परळी मतदार संघात रूपांतरित झाला. या मतदार संघाचं वैशिष्ट्य म्हणजे हा कायम पुरोगामी विचारांच्या पाठीशी राहिलेला मतदार संघ आहे. अण्णाभाऊ गित्ते, रघुनाथराव मुंडे, पंडितराव दौंड, स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यासारखे मोठे नेतृत्व या भागाने राज्याला दिलेले आहेत. सोयाबीन, ऊस, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या इथे मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येईल. राजकीय दृष्ट्या फार संवेदनशील असलेला हा भाग आहे. राज्यातील बड्या नेतृत्वापैकी शरद पवारांच्या आणि गोपीनाथराव मुंडे यांच्याच विचारांच्या पाठीशी उभा असलेला हा भाग आहे. अलीकडच्या काळात राजकीय अदलाबदलीत जुनेच परंतु नव्याने राजकीय पटलावर उदयास आलेले व्यक्तिमत्व म्हणजे राजाभाऊ फड... त्यांनी नुकताच शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने परळी मतदारसंघात हे नाव विशेष अर्थाने आता पुढे आले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर जरी हे नाव नव्याने आले असेल तरीही त्यांचा राजकीय अनुभव मोठा आहे, सामाजिक कार्याचे व्यासंगी व्यक्तित्व असल्याने मोठा लोकसंपर्क आहे, कारखानदार आणि व्यावसायिक असल्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नाची जाणीव आहे, उच्च शिक्षित असल्याने महिला, मुली आणि विद्यार्थ्यांच्या नेमक्या प्रश्नांची जाण आहे. त्यांच्या व्यक्तित्वच्या जुन्याच परिचयाचा हा नव्याने धांडोळा...

# राजेभाऊ फड

Rajebhau Phad

## बहुआयामी उच्चशिक्षित व्यक्तिमत्व...



०३ जून १९८० रोजी राजाभाऊ फड यांचा कन्हेरवाडी येथे जन्म झाला. इथेच प्राथमिक शिक्षण झाले आणि परळी वैजनाथ येथे पुढील शिक्षण त्यांनी घेतले. पदवीचे शिक्षण पूर्ण करून बिपिएड पूर्ण केले. महाविद्यालयीन जीवनातच चळवळीचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. आज जरी राजकीय क्षेत्रात त्यांची नव्याने ओळख महाराष्ट्राला झाली असली तरी ते मागील अनेक वर्षांपासून या क्षेत्रात कार्यरत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांच्या पक्षाचे युवक प्रदेश उपाध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. त्यांचे सासरे आ.रत्नाकर गुट्टे यांना २०१९ विधानसभा निवडणुकीत निवडून आणण्यात "किंगमेकर" म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि त्यांनी रणमैदानात बाजी मारली. विशेष म्हणजे जनतेच्या प्रश्नांची जाण ठेवत आलेल्या अडचणींना दूर करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले आणि आजही करत आहेत. जनतेला दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करण्यासाठी ते प्रत्येकाच्या हाकेला धावून जातात. एकदा जुळलेली नाळ ते कधीही तुटू देत नाहीत त्यामुळे त्यांचा सर्वदूर जनसंपर्क आहे ही त्यांच्या जमेची विशेष बाजू आहे असे म्हणावे लागेल. प्रत्यक्षात जाऊन काम करणे याचा अर्थ काय...? तर सामाजिक आणि राजकीय जीवनात काम करत असताना ज्या लोकांच्या पाठबळावर आपण राजकारण करतो त्यांच्या प्रत्येक अडचणीला धावून जाणे हा राजाभाऊ फड यांचा स्वभाव. स्वतःच्या आईला सरपंच करण्याचे आणि हेलिकॉप्टरने गावात घेऊन येण्याचे स्वप्न त्यांनी पूर्ण करून दाखवले. "जोपर्यंत आई सरपंच आहेत तोपर्यंत गावातील प्रत्येक मुलीच्या लग्नाला १० हजार रुपयांची मदत करणार" अशी प्रतिज्ञा त्यांनी केली आणि अखंडपणे ते आजही पाळत आहेत. मागील २५ वर्षांपासून ग्रामपंचायत त्यांच्या ताब्यात आहे. सरपंच म्हणून मतदारसंघातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या गावाचा त्यांनी कायापालट करून दाखवला. शासकीय योजना खेचून आणणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि विकासाची ही गंगा सर्वसामान्य लोकांच्या उंबऱ्यापर्यंत नेण्याचे काम राजाभाऊ यांनी केले आहे. हाच वासा आणि वारसा कायम अखंडपणे त्यांनी पुढे सुरू ठेवला आहे.



## राजकीय, सामाजिक क्षेत्रातील सर्वपरिचित हक्काचा माणूस

### उद्यमी कार्यकर्ता!

### संवेदनशील युवा नेता

### दूरदृष्टीचा माणूस

प्रस्थापितांच्या दबावाला बळी न पडता त्यांनी आजवर राजकारण केले. गुंडगिरी, दादागिरीला न जुमानता अनेक निवडणूका त्यांनी लढवल्या. कधी विजय वाट्याला आला तर कधी पराभव झाला. ऊन सावलीच्या या खेळाची गंमत त्यांनी पाहीलेली आहे. 2019 च्या गंगाखेड विधानसभा निवडणुकीत सासरे आ.रत्नाकर गुट्टे यांची संपूर्ण प्रचार यंत्रणा हाताळली. त्या निवडणूकीत त्यांनी श्री गुट्टे यांना निवडणूक आणले आणि किंगमेकर ठरले. राजेभाऊ फड यांनी कोद्री जिल्हा परिषदेची निवडणूक लढवली मात्र त्यात त्यांचा अल्प मतांनी निसटता पराभव झाला. परळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अटीतटीच्या निवडणुकीत त्यांनी दणदणीत विजय मिळवला. ही निवडणूक संपूर्ण राज्यात गाजली होती. कृ.ऊ.बा.च्या निवडणूकीत तर त्यांच्या समोरील उमेदवार हे आताचे आमदार आहेत. म्हणजेच अत्यंत टोकाच्या लढाया लढून एखाद्या योद्ध्याप्रमाणे त्यांनी जिंकल्या आहे. झालेच तर कन्हेरवाडी ग्रामपंचायतचा मागील अनेक वर्षांपासून ते कारभार पाहत असल्याने त्यांना मोठा राजकीय अनुभव आहे.



व्यवसायाकडून राजकारणाकडे वळत असतांना त्यांनी काही गोष्टींचा विचार नक्कीच केलेला होता. ज्या क्षेत्रात आपण जात आहोत, त्या क्षेत्राचा लोककल्याणासाठी आणि जनसेवेसाठी वापर करायचा असाच ठामनिश्चय त्यांनी केलेला होता. आजवरच्या जीवनात त्यांनी अनेक राजकीय पक्षांमध्ये काम केले. पक्ष जरी बदलले असले तरी ते नेतृत्व, ते व्यक्तीमत्व आणि त्यांच्यातील कार्यकर्तृत्वाचे गुण मात्र जशास तसेच आहेत. भाऊंच्या कामाच्या कार्यकक्षा कुठल्याही एका वर्तुळापुरत्या मर्यादीत नाहीत. सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक, धार्मिक, शैक्षणीक अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांची भरीव कामगिरी आहे. वेळ, काळ आणि प्रसंग ओळखून धावून जाण्याची त्यांच्याकडे हातोटी आहे. एरव्ही तर ते त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला पूर्ण क्षमतेने मदत करतातच, मात्र सार्वजनिक संकटांच्या काळातही ते नेहमीच निरपेक्ष भावनेने समाजसेवेसाठी पुढे असतात. कोरोना महामारीच्या काळात त्यांनी शेकडो नव्हे तर हजारो जीवांना मदत केली. निराश्रीतांना आसरा, तहानलेल्यांना पाणी, भुकेल्यांना अन्न आणि गरजूंवर उपचाराची त्यांनी सोय केली. एकूणच त्यांनी चौफेर पध्दतीचे काम या काळात त्यांनी केले. असे नव्हे की फक्त गावातील आणि शहरातील गरजवंतांच्या मदतीला ते धावून जातात, तर मतदारसंघातील शहरी आणि ग्रामिण भागातील प्रत्येकाच्या मदतीला जाण्यास ते नेहमी तत्पर असतात. मदतीचा हात पुढे करीत असतांना त्यांनी नाव, गाव, जात, पात, पक्ष, शहरी, ग्रामिण असा कधीही भेदभाव केला नाही. आपल्याकडे आलेला माणूस हा आपलाच असे ते समजतात. ज्यांनी आपल्याला जीव लावला ती जीवाची माणसं असे समजण्याचा त्यांचा स्थायी स्वभाव आहे. आगामी विधानसभा निवडणूकीस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून त्यांना तिकीट मिळण्याची दाट शक्यता आहे. त्यांनी पक्षाकडे मुलाखतसुध्दा दिलेली आहे. पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार साहेब जे सांगतील तोच उमेदवार अंतिम असून, आपणही त्यांच्याच आदेशाचे पालन करणार असल्याचे ते म्हणतात. पक्षाने दिलेला उमेदवार म्हणजे तोच आमदार हे समजून ते या निवडणूकीत कामाला लागले आहेत...

- अक्षय मुंडे

